# वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी

## विद्यापीठाने निर्मिती केलेले सुधारीत व संकरीत वाणाबद्दल सर्व समावेशक व सविस्तर माहिती

| अ.क्र. | तपशील | | सविस्तर माहिती |
|---|---|---|---|
| १ | पीक/वाणाचे नाव | | **करडई : पीबीएन -८६ (पुर्णा)** |
| २ | प्रसारीत केल्याचे वर्ष | | २०१५ |
| ३ | प्रसारीत करणारी संस्था/विद्यापीठ | | वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी |
| ४ | जमीन | | मध्यम ते भारी काळी, उत्तम निचरा आणि ओलावा टिकुन ठेवणारी |
| ५ | हवामान | | कोरडया हवामानात करडई पीक चांगले येते. करडई पिकास अतिशय थंड किंवा उष्ण हवामान अयोग्य आहे. अती जास्त पाऊस व आर्द्रतेमध्ये बुरशीजन्य रोगांच्या प्रादुर्भावामुळे करडई तग धरु शकत नाही. |
| ६ | पेरणी/लागवडीचा कालावधी | | सप्टेंबरचा शेवटचा आठवडा ते ऑक्टोबरच्या पहिल्या आठवडयात |
| ७ | प्रती एकर बियाणे | | ४ ते ५ किलो |
| ८ | पीक व्यवस्थापन | | |
| | १ | लागवडीचे/पेरणीचे व्यवस्थापन | **अ. जमिनीची निवड व पुर्व मशागत**<br>करडई पिकाला मध्यम ते भारी, उत्तम निचरा, ओलावा टिकुन ठेवणारी जमीन निवडावी हे पीक सर्व प्रकारच्या जमिनीत येते.<br>**ब. बीजप्रक्रिया (रासायनिक)**<br>पेरणीअगोदर थायरम कॅप्टन किंवा कार्बेन्डॅझीम बीजप्रक्रिया करावी.<br>**क. पेरणी वेळ**<br>सप्टेंबरचा शेवटचा आठवडा ते ऑक्टोंबरच्या पहिल्या आठवडयात<br>**ड. लागवडीचे अंतर**<br>४५ x २० सेमी. |
| | २ | खत व्यवस्थापन | कोरडवाहू ४० किलो नत्र व २० किलो स्फुरद प्रती हेक्टरी<br>बागायती ६० किलो नत्र व २० किलो स्फुरद प्रती हेक्टरी |
| | ३ | पाणी व्यवस्थापन | सोडओळ पध्दतीने किंवा रूंद सरी वरंबा पध्दतीने किंवा तुषार सिंचन पद्धतीने पेरणीनंतर ३० ते ४० दिवसांनी (बाल्यावस्था) एक पाणी, पेरणीनंतर ६५ ते ७० दिवसांनी (पीक फुलावर येते वेळेस) दुसरे पाणी, पेरणीनंतर ८५ ते ९० दिवसांनी (बोंड भरण्याची अवस्था) तिसरे पाणी. |
| | ४ | कीड व्यवस्थापन | मावा व किडी नियंत्रण रोगर ३० ईसी ७५० मिली/हे. ५०० ली. पाण्यात मिसळुन फवारावे. पानावरील ठिपक्यासाठी डायथेन-एम-४५ (१२५० ग्रॅम) ५०० ली. पाण्यात मिसळुन फवारावे. |
| | ५ | रोग व्यवस्थापन | मर रोग-रोगप्रतीबंधक वाणांची पेरणी करावी. पाणी साचू देवू नये. |
| ९ | पिकाचा कालावधी | | १३५ ते १३८ दिवस |

| | | |
|---|---|---|
| **१०** | **उत्पादकता** | ७ ते ८ क्विंटल प्रती एकर (बागायती)<br>४ ते ५ क्विंटल प्रती एकर (कोरडवाहू) |
| **११** | **वाणाची वैशिष्ट्ये/विशेष गुणधर्म** | १. तेलाचे प्रमाण ३० टक्के<br>२. मावा कीड व मर रोगास सहनशील<br>३. पानावरील ठिपके रोगास सहनशील |
| **१२** | **वाणासंबंधीचे छायाचित्रे** |  |